MHAU060023352022

# नियमित दावा क्र. ३८७/२०२२ नि.क्र. ५ आणि ३३ खालील आदेश

## ( विलास गिरी वि. कल्याण गिरी व इतर)

०१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी यांचेविरुध्द तुर्तातुर्त ताकीद मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे.

**वादीचा प्रस्तुतचा अर्ज थोडक्यात खालीलप्रमाणे** –

**०२.** वादी आणि प्रतिवादी क्र. १ हे सख्खे भाऊ असुन, प्रतिवादी क्र. ३ ही प्रतिवादी क्र. १ ची पत्नी, प्रतिवादी क्र. २ हा वादी व प्रतिवादी क्र. १ चा भाऊ आणि प्रतिवादी क्र. ४ ही प्रतिवादी क्र. २ ची पत्नी आहे. वादी आणि प्रतिवादी क्र. १ चे वडील आसाराम पुंजाबा गिरी हे दावा मिळकत गट क्र. ४ मौजे टाकळी (ल), ता. कन्नड, जि. औरंगाबाद, एकुण क्षेत्रफळ ४ एकर, ११ गुंठे व पोटखराब १५ गुंठेचे मालक व कब्जेदार होते. ते मयत झाल्यानंतर प्रतिवादी क्र. १ च्या नावे व इतरांच्या नावे फेरफार क्र. ६३९ मंजुर करण्यात येवुन त्यांच्या नावे ७/१२ उता–यात वारसाने नोंद घेतलेली आहे. वादी व प्रतिवादी क्र. १ यांना वारसाने आलेल्या दावा मिळकतीपैकी ७४ आर जमीन ही शिवना टाकळी मध्यम प्रकल्पात संपादित करण्यात आलेली आहे आणि जमिनीचा मावेजा हा वादी आणि प्रतिवादी क्र. १ यांना मिळालेला असून सदर जमीन संपादनाबाबत फेरफार क्रमांक ८७९ मंजुर करण्यात आलेला आहे. वादी व प्रतिवादी क्र. १ चे वडील नामे आसाराम गिरी यांची गट क्र. ४ मधील २ हेक्टर ७९ आर जमीन धरणाच्या शेतीसाठी संपादित करण्यात आलेली होती. तथापी त्याची नोंद महसुल अभिलेखात लवकर करण्यात आलेली नव्हती. त्याचा फेरफार क्र. १३५६ हा दिनांक २५.०७.२०२२ रोजी मंजुर करण्यात आला. गट क्र. ४ पैकी ७४ आर आणि २ हेक्टर ७९ आर जमीन शिवना टाकळी प्रकल्पात संपादित झाल्यानंतर

वादी व प्रतिवादी क्र. १ ची गट क्र. ४ मध्ये ३ हेक्टर ४७ आर जमीन शिल्लक राहिलेली आहे, जे चुकीचे क्षेत्र दर्शविण्यात आलेले आहे. गट क्र. ४ मध्ये प्रतिवादी क्र. १ चे फक्त ५३ आर क्षेत्र शिल्लक आहे. त्यानंतर वादी व प्रतिवादी क्र. १ मध्ये दावा मिळकत गट क्र. ४ व गट क्र. ११८ बाबत वाटण्या झाल्या. त्यानुसार दावा मिळकत गट क्र. ४ पैकी ३ हेक्टर ४७ आर क्षेत्र प्रतिवादी क्र. १ यास व ५ आर क्षेत्र वादीस व गट क्र. ११८ यातील ९६ आर क्षेत्र वादीच्या वाटणीस आलेले आहे व त्याबाबत फेरफार क्र. ९३७ मंजुर करण्यात आलेला आहे. अशा प्रकारे वादीची मिळकत ५ आर व प्रतिवादी क्र. १ ची दावा मिळकत गट क्र. ४ मध्ये संपादित क्षेत्र वजा जाता फक्त ५३ आर जमीन मालकी व वहीवाटीची आहे. गट क्र. ४ मध्ये वादीची ५ आर जमीन त्याच्या पुर्वेस आणि उत्तरेस प्रतिवादी क्र. १ ची कल्याणची जमीन, पश्चिमेस टाकळी चापानेर रोड, दक्षिणेस उजव्या कालव्याचा पाट अशी वाद मिळकत आहे. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचा सदरील जमीनीशी काही एक संबंध नसतांना ते वादीस सतत अडथळा आणतात. वादीने दावा मिळकतीमध्ये अद्रक हे पिक लावलेले आहे. दिनांक ०५.१०.२०२२ रोजी सदरील मिळकतीस प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी वादीच्या जमीनीत हरकत अडथळा आणला असाच हरकत अडथळा राहिल्यास वादीचे आर्थिक नुकसान होईल. सबब, वादीने प्रस्तुतच्या अर्जाद्वारे सदरील ५ आर जमीनीत प्रतिवादी यांनी त्यांचे नोकर, चाकर, हस्तक व इतरांनी वादी अडथळा करु नये असा तात्पुरता मनाई हुकुम मागितलेला आहे.

**०३.** सदरील अर्जास प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी निशाणी क्र. १४ वर उत्तर दिलेले आहे. त्यांनी वादी व प्रतिवादी यांच्यातील नातेसंबंध कबुल केलेले आहेत. त्यांनी फेरफार क्र. ८७९ अन्वये ७४ आर जमीन ही आसाराम पुंजाबा गिरी, कल्याण आसाराम गिरी व विलास आसाराम गिरी यांच्या नावाने संपादित झाल्याचे कथन केले आहे. प्रतिवादींनी फेरफार क्र. १३५६ हा बेकायदेशीर रित्या करण्यात आल्याचे कथन केले आहे. प्रतिवादी क्र. १ च्या नावाने ६८ आर क्षेत्र व दिनांक १८.०१.१९९९ रोजी वादीने केलेल्या वाटणीपत्रकानुसार प्रतिवादी क्र. १ च्या नावाने ५ आर क्षेत्र असे एकुण ७३ आर क्षेत्र प्रतिवादीच्या ताब्यात असुन त्याबाबत वहिवाट असुन त्याठिकाणी

प्रतिवादीच्या नावाने बोर, पाईपलाईन आणि विद्युत कोटेशन असल्याचे कथन केलेले आहे. वादीने दिनांक १८.०१.१९९९ रोजी प्रतिवादी क्र. १ यांनी साक्षीदारांसमक्ष वाटणीपत्र करुन दिलेले आहे. त्या वाटणी पत्रकानुसार गट क्र. ४ मध्ये असलेली जमीन कल्याण आसाराम गिरी प्रतिवादी क्र. १ यांच्या नावाने करण्यात येईल त्यासाठी विलास गिरी (वादी) यांची काही एक हरकत राहणार नाही असे वाटणीपत्रात स्वखुशीने साक्षीदारासमक्ष करुन दिलेले आहे. त्यामुळे गट क्र. ४ मध्ये वादीचे कुठलेही क्षेत्र नाही व त्याचा ताबा देखील नाही. परंतु ७/१२ उता–यावरील राहिलेल्या नावाचा गैरफायदा घेवुन ताबा नसताना, वहिती नसताना वादीने प्रस्तुतचा खोटा दावा दाखल केलेला आहे. वादीने वाद मिळकतीच्या चुकीच्या चतुःसिमा दाखविलेल्या आहेत. प्रत्यक्षात वादीचे गट क्र. ४ मध्ये काही एक क्षेत्र शिल्लक नाही. त्यामुळे वादीचा या जमीनीत वहिती व मशागत करण्याचा प्रश्नच येत नाही. दिनांक ०५.१०.२०२२ रोजी काही एक घटना घडलेली नसुन प्रतिवादींनी वादीस काही एक हरकत अडथळा निर्माण केलेला नाही. त्यामुळे त्यांनी प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्याबाबत विनंती केलेली आहे.

**०४.** तसेच मुळ प्रतिवादी क्र. १ यांनी मुळ वादीविरुध्द प्रतिदावा दाखल करुन निशाणी क्र. ३३ अन्वये तुर्तातुर्त मनाई हुकुमाचा अर्ज दाखल केला आहे. मुळ प्रतिवादींनी त्यांच्या वरील म्हणण्यात नमुद केल्याप्रमाणे गट क्र. ४ टाकळी ल., ता. कन्नड, यातील ५ आर क्षेत्र हे दाव्यातील मुळ प्रतिवादी क्र. १ यांच्या कब्जेवहिवाटीत असल्याचे कथन केले आहे. त्या जमीनीवर ऊस हे पिक लावलेले आहे. दिनांक २७.०१.२०२४ रोजी मुळ वादीने मुळ प्रतिवादी यांचे क्षेत्रात येवुन हरकत अडथळा निर्माण केल्याचे व ''ही जमीन आमची आहे, सोडुन द्या'' अशी धमकी दिल्यामुळे मुळ प्रतिवादींनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. त्यांनी सदर ५ आर क्षेत्रावर मुळ वादी यांनी त्यांचे नातेवाईक, नोकर, चाकर, हस्तक व इतर कोणीही मुळ प्रतिवादीस हरकत अडथळा करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळण्याची विनंती केली आहे.

**०५.** त्यास मुळ वादी यांनी निशाणी क्र. ३५ वर म्हणणे दाखल केले आहे व

त्यांनी त्यांच्या दाव्यात नमुद केल्याप्रमाणे कथने प्रस्तुत म्हणण्यात नमुद केले आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे ५ आर क्षेत्र हे त्यांच्या ताब्यात वाटणी आधारे आलेले आहे. त्या क्षेत्रावर मुळ प्रतिवादींचा काही एक संबंध नाही. दिनांक २७.०१.२०२४ ही काल्पनिक तारीख दर्शविलेली आहे. सबब, त्यांनी प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

**०६.** वादीच्या विधीज्ञांचा व प्रतिवादी यांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. त्यावरुन माझे समोर आलेले मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | मुळ वादी किंवा मुळ प्रतिवादी यापैकी कोणास प्रथमदर्शनी केस आहे ? | **मुळ वादी** |
| २ | सोयीचा समतोल कोणाच्या बाजुने आहे ? | **मुळ वादी** |
| ३ | मुळ वादी किंवा मुळ प्रतिवादी यापैकी तुर्तातुर्त मनाई हुकुम न दिल्यास कोणास अपरीमीत असे नुकसान होणार आहे ? | **मुळ वादी** |
| ४ | काय आदेश ? | **मुळ वादीचा निशाणी क्र. ५ चा अर्ज मंजुर करण्यात येतो. मुळ प्रतिवादींचा निशाणी क्र. ३३ वरील अर्ज नामंजुर करण्यात येतो व अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

**०७.** मुळ वादीने त्यांच्या कथनाच्या पृष्ठर्थेसाठी भुमापन क्र. ४ टाकळी (ल),

ता. कन्नड येथील ७/१२ उता-याची प्रमाणित प्रत, छायाचित्रे, तहसिलदार यांना उपविभागीय अधिकारी कन्नड यांनी दिलेले पत्र, फेरफार क्र. ६३९ यांची छायांकित प्रत, फेरफार क्र. ९३७ याची प्रमाणित प्रत, फेरफार क्र.८७९ याची प्रमाणित प्रत, फेरफार क्र. १३५६ याची प्रमाणित प्रत, निवाडा विवरणपत्र याच्या छायांकित प्रती अभिलेखावर दाखल केलेले आहेत. याउलट प्रतिवादी यांनी गट क्र. ४ मध्ये पिक पाहणीच्या नोंदीबाबत उपविभागीय अधिकारी, कन्नड यांनी तहसिलदार, कन्नड यांना दिलेल्या पत्राची प्रत अभिलेखावर दाखल केली आहे.

०८. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, मुळ वादी व मुळ प्रतिवादी यांचा ५ आर क्षेत्राबाबत वाद आहे. वादीच्या कथनाप्रमाणे सदरचे ५ आर क्षेत्र हे वाटणीद्वारे वादीच्या हक्कात करण्यात आलेले आहे. याउलट प्रतिवादींच्या म्हणण्यानुसार सदरचे ५ आर क्षेत्र हे त्यांच्या ताब्यात असुन ते वाटणीने त्यांच्या हिशास आलेले आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, मौजे टाकळी ल. येथील ७/१२ उता-यावर मूळ वादी विलास गिरी यांच्या नावाने ५ आर क्षेत्र व मूळ प्रतिवादी कल्याण गिरी यांच्या नावाने ५३ आर व पोटखराब १५ आर क्षेत्र दिसुन येते. सदरचे ५ आर क्षेत्र हे मूळ वादीच्या नावे फेरफार क्र. ९३७ अन्वये आलेले आहे. सदरच्या फेरफाराची प्रमाणित प्रत अभिलेखावर दाखल आहे. तसेच सदरचे ५३ आर व पोटखराब १५ आर क्षेत्र मूळ प्रतिवादी क्र. १ च्या नावे करण्यात आलेले आहे. मूळ वादी यांनी त्यांच्या कथनाच्या पृष्ठर्थ अभिलेखावर दाखल केलेले कागदपत्र मुळ वादीच्या कथनास पुष्टी देतात. मूळ प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे सदरची ५ आर क्षेत्र हे मूळ प्रतिवादीच्या नावाने दिनांक १८.०१.१९९९ रोजी झालेले आहे व वाटणी पत्रकानुसार मुळ प्रतिवादीच्या नावावर आलेले आहे. परंतु मूळ प्रतिवादी क्र. १ यांनी त्यासंदर्भात कोणतेही कागदपत्र अभिलेखावर दाखल केलेले नाही. अभिलेखावर दाखल केलेले कागदपत्र सदरचे ५ आर क्षेत्र हे वादीच्या नावे वाटणीद्वारे आल्याचे दर्शवितात. याउलट मूळ प्रतिवादीच्या कथनांच्या पृष्ठर्थ अभिलेखावर कोणतेही कागदपत्रे आलेले नसल्याने त्याबाबतचे मूळ प्रतिवादी क्र. १ चे म्हणणे सुसंगत असे प्रमाणे प्रथम दर्शनी कागदपत्रान्वये दिसुन येत नाही. मूळ प्रतिवादी क्र. १ यांनी फक्त

उपविभागीय अधिकारी, कन्नड यांनी तहसिलदार, कन्नड यांना दिलेल्या पत्राची प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. त्यात उपविभागीय अधिकारी यांनी तहसिलदार यांना सदरील गट क्र. ४ मधील ५ आर क्षेत्राच्या चुकीच्या नोंदणीबाबत संबंधीतांवर कारवाई करुन गुन्हा दाखल करण्याबाबतच्या अर्जाची छायांकित प्रत कार्यवाहीसाठी तहसिलदार यांच्याकडे पाठविलेली आहे. परंतु सदर अर्जावर तहसिलदार यांनी काय आदेश केला किंवा त्यासंदर्भात काय पाहणी केली व त्यांनी त्याचा काय अहवाल सादर केला, याबाबत कोणतेही कागदपत्रे अभिलेखावर दाखल केलेली नाही. सबब, अभिलेखावर आलेल्या कागदपत्रांच्या अनुषंगाने ५ आर क्षेत्र हे मुळ वादी यांच्या ताब्यात असल्याचे दिसुन येते. सबब, मुळ वादीस प्रथमदर्शनी केस आहे, असे म्हणता येईल. सबब, मी मुद्दा क्र. १ चे उत्तर मुळ वादी यास प्रथमदर्शनी केस आहे असे नोंदवित आहे.

**<u>मुद्दे क्रमांक २ व ३ बाबत –</u>**

०९. वरील चर्चेच्या अनुषंगाने मुळ प्रतिवादी क्र. १ यांच्या कथनाप्रमााणे सदर ५ आर क्षेत्रात त्यांनी ऊसाची लागवड केली आहे. याउलट मुळ वादी यांनी त्यांच्या कथनात असे नमुद केले आहे की, त्यांनी अद्रकची लागवड केली आहे. परंतु, मुळ प्रतिवादींनी त्यासंदर्भात कोणतेही कागदपत्रे किंवा छायाचित्रे अभिलेखावर दाखल केलेली नाही. याउलट, मुळ वादी यांनी त्यांच्या कथनांच्या पृष्ठर्थ कागदपत्रे व छायाचित्रे अभिलेखावर दाखल केली आहेत. सबब, मुळ वादीच्या बाजुने सोयीचा समतोल दिसुन येतो. मुळ वादी यास प्रथमदर्शनी केस दिसुन येत असल्याने मुळ वादी यांना जर तुर्तातुर्त मनाई हुकुम दिला नाही तर मुळ वादी यांना गैरसोईचे होवुन त्यास अपरिमीत असे नुकसान होईल, असे दिसुन येते. सबब, मी मुद्दा क्र. २ व ३ यांचे निष्कर्ष मुळ वादी यास सोईचा समतोल आहे व तुर्तातुर्त मनाई हुकुम न दिल्यास मुळ वादीस अपरिमीत नुकसान होईल,असे नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ४ बाबत –</u>**

**१०.** एकंदर वर चर्चिलेल्या सर्व बाबींचा विचार करता मुळ वादीचा अर्ज मंजुर करुन मुळ प्रतिवादीचा अर्ज नामंजुर करणे न्यायोचित ठरेल. सबब, मी मुद्दा क्र. ४ करीता खालील आदेश पारीत करत आहे.

**आदेश**

१. निशाणी क्र. ५ वरील मुळ वादीचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. निशाणी क्र. ३३ वरील मुळ प्रतिवादींचा अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

३. मुळ प्रतिवादींनी वाद मिळकत गट क्र. ४, टाकळी (ल), ता. कन्नड मधील ५ आर क्षेत्र हे प्रस्तुत प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत मुळ वादीच्या वहिवाटीस कोणत्याही प्रकारे स्वतः, त्यांचे नोकर, चाकर, हस्तक यांच्यामार्फत हरकत व अडथळा निर्माण करु नये असा तात्पुरता मनाई हुकुम देण्यात येत आहे.

४. सदरच्या अर्जाचा खर्च अंतिम न्यायनिर्णयात राहील.

RUPALI SURESHCHANDRAJI TAPADIYA

Digitally signed by RUPALI SURESHCHANDRAJI TAPADIYA
Date: 2026.03.13 19:08:32 +0530

**दि. १३/०३/२०२६**

**(सौ. आर. एस. तापडीया)**

**सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,**

**कन्नड.**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : Rajesh M. Sonawane |
| Name of the Court | : Smt. R. S. Tapadiya,<br>2nd Jt. Civil Judge J. D. Kannad. |
| Date of the Order | : 13.03.2026 |
| Order signed by the<br>Presiding Officer on | : 13.03.2026 |
| Order uploaded on | : 14.03.2026 |